१८|४|१८

# मुंबई विद्यापीठ

क्र. संलग्नता /आय.सी.सी./२०१८–१९/ ३१

परिपत्रकः-

संलग्न/ संचलित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यता प्राप्त संस्थांचे संचालक, विद्यापीठातील विभाग प्रमुख/ संचालक यांना कळविण्यात येते की, दिनांक ७/०४/२०१८ रोजी सह्याद्री अतिथीगृहात पार पडलेल्या जेबीव्हीसी (Joint Board of Vice Chancellor) च्या बैठकीत काही महत्वाच्या निर्णयामध्ये विद्यापीठ परीसर व संलग्न महाविद्यालयांमध्ये मुलींसाठी उपलब्ध असलेले स्वच्छता गृह व त्याची स्वच्छता याबाबत मा. कुलपतींनी एक महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रचलित नियमानुसार मुलींसाठी आवश्यक असलेले स्वच्छता गृह उपलब्ध करून दयावे व त्याची योग्य ती स्वच्छता राखावी.

महाविद्यालयांना संलग्नता देतांना स्थानिक चौकशी समितीमध्ये (LIC Report) मुलींच्या स्वच्छता गृहाबाबतचा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल.

(डॉ. दिनेश कांबळे)
प्र. कुलसचिव

मुंबई – ४०० ०३२.
२० ऑगस्ट, २०१८

प्रति,
प्राचार्य/ संचालक/ संलग्नित महाविद्यालयांचे व मान्यता प्राप्त संस्था
उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग (फोट/ कालीना)
विद्यापीठ अभियंता
विभाग प्रमुख/ संचालक, मुंबई विद्यापीठ.